वर्ष-०६ | अंक-५२ | मुंबई, मंगळवार १७ ते २३ नोव्हेंबर-२०२० | पृष्ठ-४ | मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक • कार्यकारी संपादक : गुरु प्रसाद नाईक • सह संपादक : सौ. डॉ. अश्विनी नाईक

PG 2 कोपरखैरणे पोलीस ठाण्याने लहान मुलीचे अपहरण करणाऱ्या आरोपीला १२ तासात केले गजाआड

3 → सेनेचं ‘स्वबळ’, भाजपच्या पोटात अजून कळ!

प्रतिबंधक व शरीरास प्राणघातक अशा मादक पदार्थांचा साठा करून...... ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## ऐन दिवाळीत थंडी गायब
### मुंबईचा पारा 36 अंशांवर




मुंबई : नोव्हेंबर महिन्याची पहाट गुलाबी थंडीने उजाडली खरी; मात्र गेल्या दोन दिवसांपासून मुंबईच्या ...पान २ वर...

## निर्बंध असूनही मुंबईची हवा अशुद्धच



कोरोना संकटाच्या पार्श्वभूमीवर दिवाळी दरम्यान मुंबईची हवा स्वच्छ ठेवण्यासाठी प्रशासनाचे प्रयत्न अपुरे ठरले आहेत. दिवाळीच्या रात्री आणि दुसऱ्या दिवशी मुंबईत ..पान २ वर...

# शिवसेना प्रमुखांच्या स्मृतीदिनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे अभिवादन




‘शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीदिनी त्यांना अभिवादन करण्यासाठी शिवसेना पक्ष प्रमुख आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे सहकुटुंब हजेरी लावली. यावेळी शिवसेना पक्षातील वरिष्ठ नेत्यांसह महाविकास आघाडीतील इतर पक्षांच्या नेत्यांचीही उपस्थिती होती. सकाळपासूनच शिवसैनिक बाळासाहेबांच्या स्मृतिस्थळाच्या दर्शनासाठी शिवतीर्थावर येत आहेत.

## बाळासाहेबांचा आठवा स्मृतीदिन

कोरोनाव्हायसरचा संसर्ग सुरु असल्याने अभिवादनासाठी येणाऱ्या सर्व शिवसैनिकांना मास्क वापरणं आणि सोशल डिन्स्टन्सिंगचं पालन करणं बंधनकारक करण्यात आले आहे.

बाळासाहेब ठाकरे शरीराने आता आमच्यासोबत नसले तरीही त्यांचे विचार आमच्यासोबत कायम राहतील असे उद्गार शिवसेना खासदार संजय राऊत यांनी यावेळी काढले. बाळासाहेबांचे हिंदुत्व आणि आताचे हिंदुत्व यावरही टिप्पणी त्यांनी केली. शिवसेना कार्याध्यक्ष म्हणून उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्री म्हणून पहिल्यांदाच स्मृतीस्थळाच्या ठिकाणी हजेरी लावली असल्याचा उल्लेखही त्यांनी यावेळी केला.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासोबत पत्नी रश्मी ठाकरे, पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे, मुलगा तेजस ठाकरे आदींचीही उपस्थिती होती. तसेच शिवसेना खासदार संजय राऊत, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, महापौर किशोरी पेडणेकर आदींनीही हजेरी ...पान २ वर...



# मुंबईकरांनी करून दाखवलं!
## गेल्या 15 वर्षांतलं सर्वात कमी ध्वनी प्रदूषण!



दिवाळी म्हणजे फटाक्यांची आतषबाजी हे सूत्र ठरलेलं आहे. दरवर्षी मुंबईकर मोठ्या संख्येने आणि त्याहून मोठ्या आवाजाचे फटाके वाजवत असतात. त्यामुळे मुंबईकरांना आनंद जरी मिळत असला, तरी मुंबईच्या ध्वनीप्रदूषणात मोठ्या प्रमाणात भर पडत होती. त्यासोबतच मुंबईतल्या हवेची पातळी देखील खालावत जात होती. या पार्श्वभूमीवर यंदा कोरोनाच्या काळात मुंबईकर काय करतील? असा भितीवजा प्रश्न सगळ्यांना पडला होता. मुंबई महानगर पालिकेने देखील कोरोनाचा प्रसार रोखण्यासाठी दिवाळी काळात कमी आवाजाचे आणि कमी प्रमाणात फटाके वाजवण्याचे निर्देश मुंबईकरांना दिले होते. या पार्श्वभूमीवर आवाज फाऊंडेशनने दरवर्षीप्रमाणे यंदाही दिवाळीमध्ये होणाऱ्या ध्वनीप्रदूषणाचं मोजमाप केलं. यंदा मुंबईत गेल्या १५ वर्षांतलं सर्वात कमी ध्वनीप्रदूषण नोंदवलं गेल्याचं समोर आलं आहे. मुंबई मिररने यासंदर्भातलं वृत्त दिलं आहे.

कोरोनाच्या काळात ...पान २ वर...


# गर्भाशयाच्या आजारासंदर्भातील औषधावर केंद्राकडून बंदी

*४० वर्ष वयोगटातील महिलांमध्ये साधारणपणे होणार युटेरिन फायब्रॉईड्स या आजारावर डॉक्टरांकडून देण्यात येणाऱ्या युलिप्रिस्टल ॲसेटेट औषधामुळे महिलांचे यकृत निकामी होत असल्याचे संशोधनातून समोर आले आहे.*



गर्भाशयातून होणारा रक्तस्त्राव आणि असह्य वेदनांसाठी वापरण्यात येत असलेले युलिप्रिस्टल ॲसेटेट हे औषधच महिलांसाठी घातक ठरत असल्याचे उघडकीस आले आहे. ४० वर्ष वयोगटातील महिलांमध्ये साधारणपणे होणार युटेरिन फायब्रॉईड्स या आजारावर डॉक्टरांकडून देण्यात येणाऱ्या युलिप्रिस्टल ॲसेटेट औषधामुळे महिलांचे यकृत निकामी होत असल्याचे संशोधनातून समोर आले आहे. त्यामुळे औषधापेक्षा इलाज भयंकर असल्याने केंद्र सरकारने युलिप्रिस्टल ॲसेटेट या औषधावर बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. चाळीशी ओलांडल्या बहुतांश महिलांच्या गर्भाशयामध्ये युटेरिन फायब्रार्सड्सचा वाढू लागल्याने त्यांना त्रास जाणवू लागतो. यामध्ये महिलांच्या ...पान २ वर...

## प्रेयसीचा गळा चिरला, त्यानंतर स्वतःच्या तोंडात सुतळी बॉम्ब फोडला, मालाडमधली धक्कादायक घटना



तोंडात सुतळी बॉम्ब फोडून एका ५५ वर्षीय व्यक्तीने आत्महत्येचा प्रयत्न केला. त्याआधी त्याने ५८ वर्षीय प्रेयसीची हत्या करण्याचा प्रयत्न केला. प्रियकर आणि प्रेयसी दोघेही गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर कुपर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. कुरार पोलिसांनी या प्रकरणात ५५ वर्षीय व्यक्ती विरोधात गुन्हा नोंदवला आहे. मिड डे ने हे वृत्त दिले आहे.

जखमी महिला मालाड पूर्वेला पुषपार्क भागामध्ये राहते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या महिलेला दोन मुली आणि एक मुलगा ...पान २ वर...

# पोलीसांसाठी योगाभ्यास शिकवणारे ज्येष्ठ नागरिक यांची घरमालकांनी केली फसवणूक

### कांदिवली मध्ये ज्येष्ठ नागरिकांची वडिलोपार्जित खोली घरमालकाने कोणतीही परवानगी न घेता केली दुसऱ्याच्या नावे

मिळालेल्या माहितीच्या आधारे कांदिवली येथे राहणारे जितेंद्र छोटालाल काटकोरिया (वय ७२वर्ष) असलेल्या ज्येष्ठ नागरिकांची घरमालक लाभूभाई चुन्नीलाल शुक्ला याने खोली क्रमांक.१९, कापडिया कॉटेज एमडी रोड, शिव मंदिर जवळ कांदिवली (पूर्व) येथे वडिलोपार्जित छोटालाल राघवजी काटकोरिया यांच्या नावे असलेली खोली कोणतीही परवानगी न घेता ही जागा जितेंद्र काटकोरिया यांच्या भावजय जयश्री रमेश काटकोरिया यांच्या नावे करण्यात आली. यावेळी मानवाधिकार बातमी पत्रास माहिती देताना जेष्ठ नागरिक जितेंद्र काटकोरिया यांने सदर व्यवहारात माझी फसवणूक करण्यात आली आहे,असे सांगितले. घरमालक व जयश्री काटकोरिया यांच्या संगनमताने हा व्यवहार करण्यात आला आहे. या वयात माझी अशी अवहेलना व्हावी यासाठी तक्रारदार जितेंद्र काटकोरिया यांनी कांदिवली पोलीस ठाणे येथे तक्रार नोंदवली आहे.सदर प्रकरणात स्थानिक पोलीसांकडून कोणतेही सहकार्य मिळत नसल्याचे ज्येष्ठ नागरिक जितेंद्र काटकोरिया यांनी सांगितले.

# पूजेसाठी ठेवलेले दागिने चोरणाऱ्यास 24 तासांत अटक



पुणे/ येरवडा - लक्ष्मीपूजनाच्या दिवशी पूजेसाठी ठेवले दागिने व रोख रक्कम चोरी करणाऱ्या आरोपीला येरवडा पोलिसांनी 24 तासांत जेरबंद केले. अविनाश उर्फ सुक्या संजय शिंदे (वय 18, रा. जय जवान नगर येरवडा) याच्यासह एका अल्पवयीन विधिसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेण्यात आले आहे. त्याच्याकडून चोरी केलेले 11 तोळे सोन्याचे दागिने, दोन मोबाईल व रोख रक्कम असा सुमारे 4 लाख 60 हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. लक्ष्मीपूजनाच्या ...पान २ वर...



पोलीस बातमी पत्र
मुंबई
२
मुंबई, मंगळवार १७ ते २३ नोव्हेंबर-२०२०

# आम्ही जीवनात काही कमवू शकलो असलो वा नसलोतरी"बाळासाहेबांचे शिवसैनिक"हे नाव नक्कीच कमावले आहे #हिंदूहृदयसम्राट



हिंदूहृदयसम्राट जी अशी व्यक्ती ती जिवनात कोणासमोर झूकली नाही..जी अशी व्यक्ती ती कधीच कोणासमोर हरली नाही.माझ्या आयुष्याच्या प्रत् येक वळणावर मला नेहमी बाळासाहेबांची आठवण येत राहिल..१७ नोंव्हेंबर उजाडला तर मला अशा व्यक्तीची आठवण येते ज्याच्यावर मी लहानपणापासून प्रेम केले..लहानपणापासून ज्यांची भाषणे ऐकून मी प्रभावित झालो असे एकमेव हिंदूहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांना विनम्र अभिवादन.मी आयुष्यात कधी देव पाहिला नाही पण मला देवावर विश्वास आहे.मी हिंदूहृदयसम्राटांना पाहिल आहे त्यांच्यात मला देव दिसला होता.एक चमत्कारीक व्यक्ती म्हणायला हरकत नाही कारण त्यांच्या शब्दाशब्दांवर अमच्यासारख्या शिवसैनिकांत रोमांच पसरत होता.एका शब्दावर पुरी कायनात हलवून टाकणारा या देशात दुसरा कोणी मी पाहिला नाही.महाराष्ट्रात ज्यावेळी लोकशाही अस्तित्वात आली त्यावेळपासून आजपर्यंत सगळ्यांनी सत्तेचा परीपाठ केला परंतू त्या सगळयात एक अशी व्यक्ती होती त्यांनी कधी सत्तेचा परीपाठ केला नाही उलट सत्ताधीश त्यांच्यासमोर लोटांगन घालीत होते ते म्हणजे आपले लाडके साहेब.साहेब आज तुमची आम्हाला एवढी आठवण येत आहे की विचारूच नका...जर मला मरण आलं तर स्वर्गात बाळासाहेबांच्या चरणापाशी मला थोडीशी जागा मिळावी एवढीच माझी देवापुढे इच्छा आहे ती इच्छा जर देव असेलच तर नक्की पुर्ण करेल कारण या जन्मात आम्ही साहेबांशिवाय दुसरा कसला विचार केलाच नाही.आम्ही जिवनात काही कमवू शकलो असलो वा नसलो तरी "बाळासाहेबांचा शिवसैनिक" हे नाव नक्कीच कमाविले आहोत.आज आमची जी किंमत ]आहे ती बाळासाहेब ठाकरे यांचा शिवसैनिक आहे म्हणून किंमत आहे.अशा महानायकास..हिंदूस्तानच्या बुलंद आवाजास..तमाम शिवसैनिकांच्या काळजास.. वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांना मानाचा मुजरा.जय महाराष्ट्र.

# दादरमध्ये प्रेयसीवर भरस्त्यात चाकूने हल्ला करुन प्रियकराचा आत्महत्येचा प्रयत्न



दादरच्या आगार बाजार या ठिकाणी भर रस्त्यात २८ वर्षीय प्रियकराने २५ वर्षीय प्रेयसीवर चाकूने हल्ला करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर स्वतःवर देखील चाकूने वार करून घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना उघडकीस आली आहे. या हल्ल्यात जखमी दोघांना वेगवेगळ्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी दादर पोलीस ठाण्यात जखमी प्रियकराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती दादर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिवाकर शेळके यांनी दिली. दादर परिसरात राहणाऱ्या २५ वर्षीय मनीषा (काल्पनिक नाव) हिचे त्याच परिसरात राहणाऱ्या २८ वर्षीय मनोज सोबत मागील चार वर्षांपासून प्रेमप्रकरण सुरु होते. मनीषा ही एका खाजगी कंपनीत टेली कॉलर म्हणून नोकरी करते, तर मनोज हा टॅक्सी चालक आहे. मागील काही महिन्यांपासून मनोजला दारूचे व्यसन जडल्यामुळे तो दारूच्या नशेत मनीषाला त्रास देत होता. त्याच्या या वागण्यामुळे मनीषा त्याला कंटाळली होती. तीने मनोज सोबतचे प्रेमसंबंध तोडण्याच्या ठरवले आणि मागील दोन महिन्यांपासून ती त्याला टाळू लागली होती. यामुळे मनोज संतापला होता. आपल्या प्रेयसीचे दुसऱ्या सोबत प्रेमप्रकरण सुरु आहे कि काय असा संशय त्याच्या मनात आला आणि त्याने तिला संपवण्याचे ठरवले.

शुक्रवारी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास मनोजने मनीषाला भेटण्यासाठी दादर येथील आगर बाजार रोडवर बोलावले. मनीषा त्याला भेटायला येताच त्याने आगर बाजार रोडवरच मनीषावर चाकूने हल्ला करून तेथून पळ काढला. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या मनीषाला घटनास्थळी दाखल झालेल्या दादर पोलिसांनी परळच्या केईएम रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. पोलिसांनी आरोपी मनोज याचा शोध सुरु केला असता तो जखमी अवस्थेत कीर्ती महाविद्या-लयाजवळ सापडला. पोलिसांनी त्याला ताबडतोब उपचारांसाठी सायन रुग्णालयात दाखल केले. प्रेयसीवर चाकूने हल्ला करून पकडले जाण्याच्या भीतीने त्याने स्वतःही आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला असल्याची माहिती दादर पोलिसांनी दिली.

दादर पोलीस ठाण्यात मनोज विरुद्ध हत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. त्याची प्रकृती सुधारताच त्याला अटक करण्यात येईल, अशी माहिती दादर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिवाकर शेळके यांनी दिली.

# घरात बसून रेल्वेतून पॉर्सल पाठवा, मोबाईलवर दिसणार पार्सलचा प्रवास!




रेल्वे गाड्यांमधून एका राज्यातून दुसऱ्या राज्यात पार्सल किंवा वस्तू पाठविण्यासाठी प्रवाशांना रेल्वे स्थानक गाठावे लागत होते. त्यानंतर त्याची पॉकिंग कशी करायची आणि पार्सल केव्हा पोहचणार याची चौकशी करावी लागत होती. मात्र आता याची गरज राहणार नाही. कारण मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने अत्याधुनिक पार्सल सुविधा सुरू केली आहे. त्याचे कंत्राट एका खासगी कंपनीला देण्यात आले आहे. यामुळे आता प्रवाशांना आपल्या घरूनच पार्सल दुसऱ्या राज्यात पाठविता येणार आहे. तसेच पॉर्सल कुठेपर्यंत पोहचले याची चौकशी जीपीएस ट्रॅकिंग माध्यमातून आपल्या मोबाईलवर नागरिकांना बघता येणार आहे.

रेल्वेच्या पॉर्सल प्रवाशांची असणार नजर

रेल्वे प्रवाशांना उत्तम सुविधा देण्यासाठी भारतीय रेल्वे प्रयत्न करत असून प्रवाशांव्यतिरिक्त महसूल गोळा करण्यासाठी नॉन फेअर योजना रेल्वेने आखली आहे. या योजनेतंर्गत प्रवाशांना एकापेक्षा एक प्रवासी सुविधा देण्याचा प्रयत्न रेल्वेकडून करण्यात येत आहे. असाच एक प्रयत्न मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने केले आहे.

विदेशाच्या धर्तीवर आता नागरिकांना आपले पॉर्सल रेल्वे गाड्यांमार्फत पाठविता येणार आहे. त्यासाठी नागरिकांना रेल्वे स्थानकावर जाण्याची गरज लागणार नाही. मध्य रेल्वेने आधुनिक पार्सल सुविधासाठी कॉम्प्रेसहेन्सिव्ह लगेज/पार्सल ॲग्रीगेशन लॉजिस्टिक्स सोल्युशन प्रोव्हायडिंग टेकनॉलोजी कंपनीशी करार केला आहे. ही कंपनी नागरिकांना रेल्वेमार्फत पार्सल पाठविण्यासाठी एक मोबाईल ॲप विकसित करणार आहे. या ॲपमार्फत नागरिकांना आपले पार्सल जीपीएस बेस्ट बुकिंग करता येणार आहे तसेच ॲपमध्ये जीपीएस ट्रॅकिंग व डिलिव्हरी सिस्टमी असणार आहे. यामुळे नागरिकांना आपले पार्सल कुठपर्यंत पोहचले आहे, याची माहिती मिळणार आहे. त्यामुळे प्रवाशांना मोठ्या प्रमाणात याच्या फायदा होणार आहे.

लगेज सुविधा मिळणार

रेल्वे प्रवासादरम्यान प्रवाशांना सामान घेऊन प्रवास करावा लागतो. त्यामुळे प्रवाशांना सामानाची काळजी घ्यावी लागते. आता प्रवाशांच्या सामान पिकअप आणि ड्रॉप करुन देण्याची सुविधासुध्दा कॉम्प्रेसहेन्सिव्ह लगेज/पार्सल ॲग्रीगेशन लॉजिस्टिक्स सोल्युशन प्रोव्हायडिंग टेक्नॉलोजी कंपनीने करुन दिली आहे. त्यामुळे तुम्हाला प्रवासात सामान घेऊन प्रवास करण्याची गरज भासणार नाही. यासाठी तुम्हाला प्रवासाअगोदर बुकिंग करावी लागणार आहे. त्यासाठी काही ठराविक लगेज दर असणार आहे.

मुंबईत लवकरच सेवा

सध्या अत्याधुनिक पार्सल सुविधेचा प्रकल्प प्रायोगिक तत्वावर मध्य रेल्वेच्या नागपूर रेल्वे स्थानकांवर सुरू करण्यात येणार आहे. मध्य रेल्वेला या करारातून वार्षिक 5 लाख रुपयांचा महसूल मिळणार आहे. या सेवेचा अभ्यास करुन लवकरच मध्य रेल्वेच्या मुंबई, ठाणे आणि कल्याण रेल्वे स्थानकासहित इतर ठिकाणीही सुविधा लवकरच सुरु करणार आहोत, अशी माहिती मध्य रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे.

# मतदार यादीत नाव कसे समाविष्ट कराल ? कसे वगळाल ?

भारत निवडणूक आयोगाने १ जानेवारी २०२१ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादीचा छाननी कार्यक्रम जाहीर केला आहे. येत्या 17 नोव्हेंबर 2020 ते 15 डिसेंबर 2020 या कालावधीत हरकती व दावे स्विकारण्यात येणार आहे. या कार्यक्रमांतर्गत ज्या मतदारांची मतदार म्हणून नोंदणी झाली नाही आणि ज्यांचे वय दि. 1 जानेवारी 2021 रोजी 18 वर्ष पूर्ण होत आहे त्यांचे नाव मतदार यादीत समाविष्ट होणे आवश्यक आहे, त्यांनी फॉर्म 6 भरुन द्यावा, असे आवाहन मुंबई शहर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राजीव निवतकर यांनी केले आहे.

असा वापरा ऑनलाईन पर्याय मृत व स्थलांतरीत मतदार असतील त्यांचा शोध घेण्यात येऊन त्यांची नावे मतदार यादीतून कमी करावयाची आहेत. त्यासाठी फॉर्म 7 भरुन द्यावयाचा आहे. तसेच मतदार यादीत नाव, वय, लिंग या बाबी चुकीच्या नोंदविल्या असतीत त्यामध्ये दुरुस्ती करावयाची आहे. यासाठी फॉर्म 8 भरुन द्यावयाचा आहे. या मोहिमेमध्ये मतदार यादी अचूक व निर्दोष होण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत. सदरचे फॉर्म ऑनलाईन पद्धतीने भरण्यासाठी www.nvsp.in या पोर्टलचा वापर करता येईल.

## पोलिसांची दिवाळी

उठलो तसा खडबडून
मी गाढ झोपेतून
वाटलं होतं थोडावेळ
मी घरीच आहे झोपून .....
अवतीभोवती बघीतलं
तर ती होती गार्डरूम
इवलीशी,अंधारलेली
तीच माझी बेडरूम....
आज उटण्याच्या सुगंधानं
अंघोळ होईल वाटलं
अन गोडधोड मिठाईनं
फराळ होईल वाटलं....
पण...व्यर्थ होतं सगळं
कारण..ते स्वप्न होतं
इथं कुठं हो माझ्या
जीवभावाचं घर होतं!..
दिवाळीचा पहिला दिवस
आज पहिली अंघोळ होती
गावाकडं लाडकी बहीण
माझी वाट बघत होती....

रात्रीच तिचा फोन आला
कधी येणार म्हणाली??
तू आला नाही न्यायला
मी सासरीच आहे म्हणाली
काढली समजूत कशीतरी
म्हणालो येईन दोन दिवसांत
करू दिवाळी साजरी ताई
आपल्या घरच्या अंगणात....
मग..आईचाही फोन आला
म्हणाली....
लवकर ये की बाळा!!
तुझे सगळे मित्र आलेत
फक्त तूच नाहीस रे बाळा...
बहिणीची काढली समजूत
पण...आईची कशी काढणार?
या वर्दीतल्या पोराची तिला
व्यथा कशी सांगणार??
कसं सांगू मी आईला..??
स्वतःच्याच हातानं लावलं
सुगंधी उटणं अंगाला

अन वाहणाऱ्या अश्रूमध्ये
न्हाऊ घातलंय स्वतःला....
कसं सांगू मी आईला..??
दिवाळीसाठी ड्रेस घेतलेला
तसाच पडून आहे!!
त्यालाही घालता आलं नाही
कारण....
आज ड्युटीचा दिवस आहे....
कसं सांगू आईला हे??
दुःख माझ्या मनातलं
काल,परवाच तर थांबलंय
पाणी तिच्या डोळ्यांतलं...
हळूच आवाजात आई म्हणाली
काही गोडधोड खाऊन घे
पैशाकडे तू बघू नकोस
मोठ्या हॉटेलात जाऊन जेव....
मिही तिचा मुलगा आहे
मला सगळं कळत होतं
ती जरी बोलत असली
तरी.....

तिचं मन मात्र रडत होतं....
मीही आलेला हुंदका दाबत
फोनचंही बटन दाबलं
अन ढसाढसा रडून मी
माझं मन हलकं केलं....
मन मात्र हलकं होईना
गुदमरल्यासारखं वाटत होतं
काय करू काहीच कळेना
घराकडंच ते पळत होतं...
रडून-रडून दमून गेलो
तरी आसवं थांबेनात
माय-बहिणीच्या आठवणीनं
पाझर फुटला नयनास....
मग वर्दीकडं हळूच बघत
उगाच हासायला लागलो
काळजातल्या वेदना मी
पुन्हा सोसायला लागलो

**वर्दितला दर्दी**

**एक वाचक कवी**

## पृष्ठ १ वरुन

### शिवसेनेचा कडक इशारा

लावली होती. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर बाळासाहेबांच्या स्मृतीस्थळावर गर्दी करु नका, आपल्या घरातूनच त्यांना अभिवादन करा, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी राज्यभरातील शिवसैनिकांना केलं आहे. तसेच स्मृतीस्थळाच्या ठिकाणी फार कोणाला प्रवेश देऊ नका, अशी सूचनाही मुंबई पोलिसांना देण्यात आली आहे. त्यानुसार इथे मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

दरम्यान खासदार सुप्रिया सुळे आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनीही ट्विटरवरून बाळासाहेब ठाकरे यांना आदरांजली वाहिली आहे.

खासदार सुप्रिया सुळे यांनी ट्विट करत म्हटले आहे की, शिवसेनाप्रमुख स्व बाळासाहेब ठाकरे यांची आज पुण्यतिथी. ते खऱ्या अर्थाने जननायक होते. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन.

अजित दादांनी ट्विट केले आहे की, ”नेतृत्व, कर्तृत्व, वक्तृत्वाच्या बळावर मराठी मनावर कायम अधिराज्य करणारे शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांना पुण्यतिथीनिमित्त भावपूर्ण आदरांजली! ”

### ऐन दिवाळीत थंडी गायब

तापमानात वाढ नोंदविण्यात येत आहे. कमाल तापमान ३६ अंश तर किमान तापमान २५ अंशांवर दाखल झाले आहे. तापमानातील वाढीमुळे ऐन दिवाळीत थंडी गायब झाल्याचे चित्र आहे.भारतीय हवामान शास्त्र विभागाकडील माहितीनुसार, मुंबईचे कमाल तापमान ३६ अंशांवर आहे. गेल्या ४८ तासांपासून हवामानात हे बदल नोंदविण्यात आले आहेत. शिवाय पुढील ४८ तासांत तापमान ३६ अंश सेल्सिअसच्या आसपास नोंदविण्यात येईल. कोकण विभागातही तापमानात वाढ नोंदविण्यात आली आहे. हे तापमान ३२ अंशांच्या आसपास असेल.मुंबईच्या किमान तापमानात नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीला चांगली घसरण झाली होती. ते १९ अंशांच्या आसपास गेले हाते. त्यामुळे गेला आठवडाभर मुंबईत थंडी होती. दिवाळीदरम्यान तापमानात वाढ होईल, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला होता. त्यानुसार, तापमानात वाढ नोंदविण्यात आली.मुंबईचे किमान तापमानn१३ नोव्हेंबर : २३ अंश सेल्सिअसn१४ नोव्हेंबर : २४ अंश सेल्सिअसn१५ नोव्हेंबर : २५ अंश सेल्सिअस"

### निर्बंध असूनही मुंबईची हवा अशुद्धच

प्रदुषण मध्य पातळीवर होते. दिवाळीच्या रात्री मुंबईचा एअर क्वालिटी इंडेक्स (AQI) १११ झाला आहे, तर रविवारी दुपारपर्यंत AQI पातळी ११५ वर पोहोचली आहे. हवेच्या गुणवत्तेवर लक्ष ठेवणारी सिस्टम ऑफ एअर क्वालिटी अँड फॉरकास्टिंग अँड रिसर्च अनुसार, चेंबूरची हवा रविवारी सर्वाधिक प्रदूषित झाली. चेंबूरची AQI २५६ नोंदली गेली. चेंबूरनंतर वरळीत सर्वाधिक प्रदूषित हवा वरळीत AQI १७४, बीकेसीमध्ये AQI १६४ आणि अंधेरीमध्ये AQI १४० राहिली. दिवाळीच्या वेळी फटाक्यांपासून होणारे वायू प्रदूषण रोखण्यासाठी प्रशासनाने फटाक्यांवर काही निर्बंध घातले आहेत. निर्बंध असूनही शनिवारी रात्री बऱ्याच लोकांनी नियमांचे उल्लंघन केले. सफरचे संचालक गुफरान बेग यांच्या म्हणण्यानुसार, २०१९ चा डेटा वगळल्यास मागील चार वर्षाच्या तुलनेत यंदा मुंबईची हवा सर्वात कमी प्रदूषित झाली आहे. मुंबईत प्रदूषणाची पातळी मध्यम राहिली. २०१९ मध्ये पावसामुळे प्रदूषणाची पातळी कमी होती.

वाढते तापमान ठरले फायदेशीर

वाढत्या उष्णतेमुळे मुंबईतील प्रदूषणाची पातळी खराब होण्यापासून फायदेशीर ठरली आहे. स्कायमेट व्हॉईसचे अध्यक्ष महेश पलावत यांनी सांगितले की, थंड हवा जोरदार आहे, थंड हवा जडपणामुळे जमिनीजवळच राहते, तर उबदार हवा हलकी आहे आणि वेगाने वरती जाते. १४ नोव्हेंबरला उष्णतेमुळे प्रदूषित हवा वर गेली. यामुळे प्रदूषणाची पातळी नियंत्रित राहिली. गेल्या काही दिवसांपासून मुंबईचे किमान तापमान निरंतर कमी होत होते. किमान तापमान १९ डिग्री सेल्सियसपर्यंत पोहोचले होते, परंतु दिवाळीच्या दिवशी तापमानात वाढ झाली होती आणि किमान तापमान २३.५ डिग्री सेल्सियसपर्यंत पोहोचले होते.

### पालिका कर्मचाऱ्यांना

आहे. ते आपल्या आजी-आजोबांकडे राहतात. जखमी महिला अंधेरीतील एका सोसायटीमध्ये जेवण बनवायचे काम करते. महिलेचे आरोपी ड्रायव्हरसोबत मागच्या १५ वर्षापासून प्रेमसंबंध होते.

आरोपी ड्रायव्हर अनेकदा महिलेच्या घरी जायचा. त्यांच्या या प्रेमसंबंधांना महिलेच्या आईचा विरोध होता. त्यावरुन महिला आणि तिच्या प्रियकरामध्ये नेहमी भांडणे व्हायची. रविवारी सकाळी सात वाजता दोघांमध्ये पुन्हा भांडण झाले असे तपास अधिकाऱ्याने सांगितले. महिला कामावर जाण्यासाठी घरातून निघण्याची तयारी करत होती.

त्यावेळी आरोपीने तिच्याकडे आपले कपडे मागितले. त्यावरुन दोघांमध्ये वादावादी सुरु झाली. संतापाच्या भरात आरोपीने त्याच्या जवळचा चाकू काढला व महिलेचा गळा चिरला. महिला खाली कोसळल्यानंतर त्याने सुतळी बॉम्ब पेटवून स्वत:च्या तोंडात ठेवला. महिला आणि तिच्या प्रियकराची प्रकृती गंभीर आहे. आयपीसीच्या विविध कलमांतर्गत आरोपी विरोधात गुन्हा नोंदवला आहे असे कुरार पोलिसांच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांनी सांगितले.

### सर्वसामान्य नागरिकांच्या जिवाशी

गर्भाशयातून मोठ्या प्रमाणात रक्तस्राव होणे, त्यांच्या गर्भाशयात असह्य वेदना होणे यासारखे त्रास होऊ लागतात. या आजारांवर अनेक डॉक्टरांकडून अन्य उपचाराबरोबरच महिलांना युलिपिस्टल ॲसेटेट हे औषध दिले जाते. पण या औषधामुळे महिलांचे यकृत निकामी होण्याचा धोका असल्याचे नुकत्याच एका संशोधनातून समोर आले आहे. त्यामुळे महिलांसाठीचे औषधच त्यांच्यासाठी घातक ठरत आहे. युरोपियन मेडिसिन एजन्सी असलेल्या फार्माकोव्हिजिलन्स रिस्क असेसमेंट कमिटीकडून (प्रॅक) मे २०१८ मध्ये यावर शिक्कामोर्तब केले आहे. युरोपमधील तीन महिलांना यकृताच्या गंभीर आजार झाल्याने त्यांना यकृताचे प्रत्यारोपण करावे लागल्याची प्रकरणे प्रॅककडे आली होती. त्यावर त्यांनी केलेल्या अभ्यासात युलिपिस्टल ॲसेटेट ५ मिलीग्रॅम इतके औषधांमुळे महिलांचे यकृत निकामी झाल्याचे दिसून आले. त्यानंतर त्यांनी केलेल्या संशोधनात ही बाब अधोरेखित झाली. त्यामुळे युलिपिस्टल ॲसेटेट हे घटक असलेल्या ‘आयस्म्या’ औषधावर फिलिपाईन्स,मलेशिया, थायलंड, सिंगापूर, आर्यलँड, दुबई या देशामध्ये बंदी घालण्यात आली आहे. इतकेच नव्हे तर बाजारामध्ये असलेले औषधेही पुन्हा मागवण्यात आली आहेत. या पार्श्वभूमीवर केंद्रीय ड्रग कंट्रोलर जनरल डॉ. व्ही.जी. सोमानी यांनी भारतातही युलिपिस्टल ॲसेटेट या औषधावर बंदी घालण्याचे आदेश दिले आहेत.

### पूजेसाठी ठेवलेले दागिने चोरणाऱ्यास

दिवशी रात्री येरवड्यातील जयजवाननगर येथे मानसिंग भोसले यांच्या अर्धवट उघड्या ठेवलेल्या खिडकीतून हात घालून कडी उचकटून घरातील दागिने, मोबाईल व रोख रक्कम असा मुद्देमाल लंपास केला होता. याप्रकरणी येरवडा पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. येरवडा तपास पथकातील कर्मचारी पोलीस हवालदार गणपत थीकोळे, पोलीस नाईक नवनाथ मोहिते, शिपाई राहुल परदेशी यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, या गुन्ह्यातील आरोपी येरवड्यातील गेनबा मोझे शाळेजवळ उभे असल्याची माहिती मिळाली होती. तात्काळ सापळा रचून त्यांना ताब्यात घेण्यात आले. अधिक तपासात त्यांनीच हा गुन्हा केल्याची कबुली दिली. गुन्हा घडल्यानंतर चोवीस तासाच्या आत आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडील गुन्ह्यातील 11 तोळे सोन्याचे दागिने 2 मोबाईल व रोख रक्कम असं चार लाख 60 हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.वरिष्ठ पोलीस निरीक्षक युनूस शेख गुन्हे निरीक्षक अजय वाघमारे, यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक समीर करपे, सहा. फौजदार प्रदीप सुर्वे, हवालदार गणपत थीकोळे, पोलीस कर्मचारी नवनाथ मोहिते, राहुल परदेशी, सुनील सकट, समीर भोरडे, अहमद शेख, अनिल शिंदे, गणेश वाघ, तेजस पवार, किरण घुटे यांच्या पथकाने गुन्हा दाखल झाल्यानंतर 24 तासाच्या आत गुन्ह्यांचा तपास लावला.

पोलीस बातमी पत्र
महामुंबइ
३
मुंबई, मंगळवार १७ ते २३ नोव्हेंबर-२०२०



## संपादकीय...

# दिवाळी, पोलीस आणि आर. आर. आबा!

दिवाळी पाडव्याला वृत्तपत्रांना सुट्टी असते. दुसऱ्या दिवशीचा अंक प्रसिद्ध होत नाही. वर्षातून मिळणाऱ्या पाच सुट्ट्यांपैकी एक साजरी करीत त्या दिवशी सांगलीत घरी थांबावे वाटे. मात्र, आम्हा पत्रकारांचे मित्र आर. आर. आबा पाटील यांनी एक ओढ लावून ठेवली होती. दिवाळी पाडव्याला सांगली जिल्ह्यातील त्यांच्या अंजनी या छोट्या गावात तीन दिवस मुक्कामास आलेल्या आबांना भेटायला जायचे आणि गप्पागोष्टी करायच्या.उपमुख्यमंत्री असताना ते गृहमंत्रिपदही सांभाळत होते. प्रोटोकॉल असल्याने नेहमी प्रचंड पोलीस बंदोबस्त असायचा; पण दिवाळीचे ते तीन दिवस अपवाद असत. वसूबारसेच्या सायंकाळी गावी पोहोचताच गाडीतून उतरल्यावर आबा पोलिसांना प्रेमाने निरोप द्यायचे, 'तीन दिवस गावी जा. दिवाळी पाडवा संपल्यावर या! मी कोठेही जाणार नाही.



२००५च्या दिवाळीला आबा उपमुख्यमंत्री झाल्यानंतर एक वर्षाने आम्ही पत्रकार गेलो. वातावरणच तसे होते. एकच लालदिव्याची गाडी झाडाखाली उभी होती. त्यांचे गावाकडील स्वीय सहायक पी. एल. कांबळे आणि बाळू गुरव यांना भेटून चौकशी केल्यावर कळले, आबा आहेत की! पलीकडच्या गल्लीत श्यामरावतात्यांची तब्येत बरी नव्हती. त्यांना भेटायला गेलेत अन् पाच-दहा मिनिटांत पांढऱ्या पॅंटच्या दोन्ही खिशात हात घालून स्लिपर ओढत आलेच ते! गावभर चालतच फिरायचे. पोलिसांचा ताफा आणि 'सरा बाजूला मंत्रिमहोदय येत आहेत', हा सर्व रुबाब गायब असायचा. विचारल्यावर म्हणायचे, 'दिवाळीच्या सणाला पोलिसांना सुट्टी दिली आहे. हा एकमेव असा सण आहे की, ज्यावेळी पोलीस बंदोबस्त लागत नाही, अन्यथा सणवार आनंद साजरा करणारे असतात; पण सणवारातही समाजात कधी तणाव निर्माण होईल, हे सांगता येत नाही. याची फार खंत वाटते. आपला समाज कधी प्रगल्भ होणार? गणेशोत्सवात अकरा दिवस पोलिसांना एक दिवस सुट्टी मिळत नाही हो!!'- असे ते अत्यंत कळवळून सांगत राहायचे. वारंवार पोलिसांचा आणि बंदोबस्ताच्या यंत्रणेचा संपर्क येत असूनही हे कधी लक्षात आले नव्हते. सर्वत्र पोलीस उभे आहेत, म्हणजे किती चोख कारभार आहे, असे वाटायचे. आबा सांगायचे , गणेशोत्सवात मुंबईत पोलीस तीन-तीन दिवसांनी घरी जातो. थोडी झोप काढून परत येतो. त्याला घरच्या मंडळींबरोबर सणही साजरा करता येत नाही. गणेशोत्सवाच्या सजावटीचे साहित्य खरेदीला मुलांबरोबर न गेलेल्या असंख्य पोलिसांशी माझे नेहमी बोलणे होते, त्यांचे दु:ख कोणाला कळणार?'आबा तसे बातम्यांचा झराच होते. दिवाळी पाडव्यादिवशी मात्र एकही बातमी करायची नाही. उद्या तुमचे पेपरच निघणार नाहीत, बरे झाले, असे म्हणत मनमोकळ्या गप्पा मारत बसायचे. सार्वजनिक जीवनातील व्यक्तींना खासगी आयुष्यातील आनंदाचे क्षण फारच दुर्मीळ असतात. काहीवेळा मुलगा रोहितची भेटदेखील व्हायची नाही. दौरे करून येईपर्यंत तो झोपलेला असायचा. सकाळी लोकांच्या भेटीगाठीत आबा असायचे तेव्हा रोहित शेजारच्या सावळज गावातील इंग्रजी शाळेत पोहोचलेला असायचा. एकदा मी त्यांच्या गाडीतून तासगावला येत होतो. रोहितला मोटारसायकलवरून घेऊन येताना दिसताच आबांनी गाडी थांबवायला सांगितली आणि गाडीतूनच भेट घेतली. तेव्हा रोहित विचारत होता, आबा, सर्व पोलीस गेले का? कारण रोहितचे लाड पोलीस करीत असत. दिवाळी पाडव्याची ही भेटीची परंपरा सलग दहा वर्षे चालू होती. २०१५ च्या १६ फेब्रुवारीला आबा गेले आणि अंजनीची वारी खंडित झाली. आजच्या पाडव्यानिमित्त ते दिवस आठवले की, सद्गदित व्हायला होते. एक जिंदादिल कार्यकर्ता, सामान्य माणसांच्या मनात डोकावणारा आणि त्याचवेळी सतत बातम्यांचा झरा त्यांच्या मुखातून वाहत असायचा. त्यामुळे पत्रकार मंडळी जाम खुश असत! राज्याचे नेतृत्व करायच्या गणिताची कोष्टके त्यांच्या मनात सोडविण्याचा नेहमी प्रयत्न असायचा हे फारच कमी जणांना माहीत होते. असे आबा, पोलीस आणि आजचा दीपावली पाडवा!

# उजेडाची ओढ..

***सात महिन्यांतले सारेच सण सावटाखाली साजरे केल्यानंतर दिवाळीनिमित्त मात्र रस्त्यांवर तुडुंब गर्दी होते, ही उत्सवप्रियता जागी असल्याचीच खूण..***

चार दिवसांची दिवाळी हळूहळू वाढत वसुबारसपासून तुळशीच्या लग्नापर्यंत गेली. यंदा खरे तर ती दोन-तीनच दिवसांची. पण उत्साह मात्र तेवढाच. किंबहुना जरा अधिकच. दिवाळीच्या निमित्ताने पुन्हा एकदा बाजारहाट करायची संधी मिळाली म्हणून रस्त्यांवर गर्दी दिसू लागली, ती गेल्या सात महिन्यांत पहिल्यांदाच. या वर्षीची होळीसुद्धा म्हणावी अशी झाली नाही. होळी ते दिवाळी हा सगळा काळ करोनाच्या भयग्रस्ततेत गेला. या काळात घरात बसण्याची सक्तीच झाली. या विश्वातील साऱ्या दुर्गुणांना अग्नीमध्ये समर्पित करण्याची होळीची भावना करोनाच्या भीतीने करपूनच गेली. गुढीपाडव्याच्या स्वागतयात्रा रद्द झाल्याच आणि नंतर तर बाहेर पडणेही मुश्कील झाले. गुरुपौर्णिमेपर्यंत मनातील अंधार आणखीच गडद होऊ लागला. 'हेही दिवस जातील' हा बिरबलाच्या कथेतील संदेश मनी ठेवून दिवस संपत गेले. नारळी पौर्णिमेची लगबग थंडावलीच आणि दहीहंडीचा उत्सव रद्द झाला. गणेशोत्सवात नाही म्हणायला उत्साह दाखवायची किंचित संधी मिळाली. मात्र नंतरच्या काही दिवसांत करोनाने पुन्हा कहर केला. दिवाळी येईपर्यंत हे सारे वैश्विक संकट दूर होईल, अशी अटकळ बांधता बांधताच काही युरोपीय देशांमध्ये पुन्हा एकदा टाळेबंदी सुरू झाली. भीतीला पळवून लावायचे, तर त्यासाठी मनाच्या गाभाऱ्यातून उत्साहाचा झरा उन्मळायला हवा. तसा तो बाजारातील गर्दीत दिसतोच आहे. जणू काही घडलेच नाही, असा सारा आविर्भाव. खरेदीचे किंवा खर्चाचे आकडे कमी झाले असतील; पण गर्दीचे लोटच्या लोट खरेदीसाठी घराबाहेर पडले. मनात उदंड आनंद निर्माण करण्यासाठीची ही तयारी, करोनाकाळातच होते आहे. अशा सावटातील यंदाची दिवाळी पुढील वर्षभराच्या मंगलमय वातावरणाची नांदी करणारी आणि प्रत्येकाच्या मनात नव्याने विश्वास निर्माण करणारी.दिवाळी आणि थंडी यांचे एक अतूट नाते. गार वाऱ्यात शाली लपेटून हिंडायला येणारी मजा यंदाही घेण्याची स्पर्धा सुरू झाली आहे. अनेक पर्यटनस्थळे यापूर्वीच 'हाऊसफुल' झाली आहेत. कुटुंबीय, नातेवाईक यांची झालेली ताटातूट दिवाळीत पुन्हा एकदा जुळवून घेण्यासाठी अनेकजण सज्ज झाले आहेत. गेल्या काही दशकांत समाज आपले सारे सण रस्त्यावर येऊन साजरे करण्यात मग्न झाला आहे. त्यामुळे दिवाळीच्या सुटीत नातेवाईकांना बोलावून फराळ करण्याची प्रथा कधी कालबाह्य झाली, हे लक्षातही आले नाही. दिवाळीच्या पहिल्या दिवशी भल्या पहाटे उठून फटाके वाजवण्याऐवजी आपण सांस्कृतिक कार्यक्रमांना हजेरी लावू लागलो. सण हा समूहाने साजरा करण्याची ही नवी रीत आता समाजाच्या जगण्याचा अविभाज्य भाग होऊ लागली आहे. यंदा सरकारी परवानगीने नाट्यगृहे आणि सभागृहे नुकतीच उघडली; पण खबरदारीच्या सरकारी खाक्यामुळे पहाटेचे दिवाळीतील कार्यक्रमही होऊ शकणार नाहीत आणि दिवाळीतील फटाक्यांच्या नेहमीच्या आतषबाजीलाही केंद्र आणि राज्याच्या नियमांची धारदार कात्री लागल्याने त्याचीही मजा लुटता येणार नाही. कामाच्या रामरगाड्यात अहोरात्र मग्न झाल्याने शिणलेल्या जिवाला दिवाळीतला हा आनंद केवढी तरी ऊर्जा देणारा.हे सारे खरे. पण नव्या उत्साहाने जगणे सुरू करण्याचा हा मंगलमय काळ यंदा करोनाच्या सावटात आहे. समाज म्हणून त्याची तमा न बाळगणे, हेही न परवडणारे. महाराष्ट्रातील सगळ्या शहरांमधील दिवाळीपूर्वीची गर्दी धडकी भरवणारी होती. सरकारी पातळीवर सतत दुसऱ्या लाटेचा जो गजर होत आहे, त्याला खतपाणी घालणारी. किमान अंतराची अशी काही अट असते का? असा प्रश्न उभा करणारी ही गर्दी मनात साठून आलेले चिंतेचे मळभ दूर करण्याच्या प्रयत्नांची असली, तरी नजीकच्या भविष्याचा घोर वाढवणारीच. मग मनातल्या आनंदाचे झरे आटू द्यायचे की काय? जगण्याच्या अन्नवस्त्रनिवारा या साध्या गरजांनाही उत्सवी रूप देण्याची संधी अशी धुडकावून लावायची की काय?निसर्गाला हिवाळ्यातील वातावरणात आणखीच खुमारी प्राप्त होते. थंडीचा हा मोसम मनाला उभारी देणारा. त्यापूर्वीच्या ऑक्टोबर महिन्यातील उष्म्याने कंटाळून गेलेल्या देहाला या गारव्याने नवे कोंब फुटू लागतात आणि आनंदाला उधाण येते. दिवाळीचा सण हा या उधाणाचेच प्रतीक. याच सणाच्या निमित्ताने अनेकरंगी चवींचे पदार्थ करून खाण्याची पद्धत खवय्यांसाठी पर्वणी. एकेकाळी दिवाळीचे म्हणून ओळखले जाणारे सगळे पदार्थ आता आपण बाराही महिने खाऊ लागलो. तयार पदार्थ थेट जिभेवर येण्याची ही सोय असली, तरीही त्यात फक्त दिवाळीतच खाण्याचे असे विशेषत्व मात्र आपोआप संपले. कपडेलत्ते हाही दिवाळीतच करायचा सोपस्कार. वर्षभराचे कपडे या एकाच सणाला खरेदी करण्यातला आनंद आपण बाराही महिने उपभोगू लागलो. दरवर्षी या सणाच्या निमित्ताने खास वस्तूची खरेदीही आता खरेदीच्या 'ऑनलाइन' व्यवस्थेमुळे सतत सुरू राहिली. मातीच्या किल्ल्यांऐवजी तयार किल्ले घरात आणून ठेवण्याची प्रथा अशीच आता अंगवळणी पडलेली. फक्त दिवाळीतच करावयाच्या अशा सगळ्या गोष्टींची यादी आता अल्प होत चालली आहे. मनातला उत्साह मात्र कमी झालेला नाही. तसा तो होताही कामा नये. माणसाची जगण्याची इच्छा केवळ पोट भरण्याने पूर्ण होत नसते.



त्यासाठी पु. शि. रेग्यांच्या 'सावित्री'तील लच्छीच्या मोराप्रमाणे 'प्रत्येकानं स्वत:पुरतं मोरच व्हायला हवं'! जगण्यातील आनंदाचे, उत्साहाचे आणि उदात्ततेचे झरे टिकवून ठेवण्यासाठी ते घडायलाच हवे.यंदाची दिवाळी संकटांचे हरण करणारी ठरो, अशी कामना करताना, आपणच आपत्तीचे निमित्त होता कामा नये, याची काळजी घ्यायला हवी. गेल्या काही लाख वर्षांमध्ये आलेल्या अनेक अभूतपूर्व संकटांवर मात करीत मानवजातीने आपले अस्तित्व टिकवून ठेवले. बुद्धीच्या जोरावर या संकटांना तोंड देण्याची व्यवस्था केली. निसर्गाशी सुरू झालेल्या युद्धजन्य परिस्थितीतही मानवाने हरप्रकारे विजय मिळवण्याचाच प्रयत्न केला. कोविड-१९सारख्या विषाणूने अवघ्या जगाला चिंतेच्या खाईत लोटले आहे. ही चिंता काहीच दिवसांची असेल, अशी आशा जगण्याचे नवे बळ देणारी असली, तरीही जगातील हजारोजणांचे या विषाणूने घेतलेले नाहक बळी आपल्या हृदयातील दु:ख अधिक दाट करणारे आहे. अनेकजण असेही आहेत, ज्यांची अर्थप्राप्तीची साधने सध्या तरी त्यांच्यापासून दुरावली आहेत.अशा भयग्रस्त अवस्थेतही यंदाच्या दिवाळीत आपला आनंद गमावता कामा नये. मानवी समूहातील नातेसंबंधांमधला भावबंध टिकवून ठेवण्यासाठी सण नावाची जी कल्पना माणसाने निर्माण केली, त्याचा दिवाळी हा एक आविष्कार. संकटकाळी बाहेर पडण्याचा हाच तो मार्ग. कॅलेंडरच्या हिशेबात यंदाचे सहासात महिने बाद झाले असतील. पुन्हा नव्याने भरारी मारण्यासाठी दिवाळीचा हा सण सगळ्यांना भविष्यकाळात मांगल्याचे दान मिळावे, अशी कामना करणारा. जगण्याच्या साऱ्या चिंता आणि दडपण विसरायला लावणारा आणि प्रत्येक क्षणाला असलेला क्षणभंगुरत्वाचा असलेला शाप विसरायला लावणारा. संकटे येतात आणि जातात. माणसांचा समूह म्हणून आपण या संकटांना तोंड देण्याची तयारी करत असतानाच चिरंतनाची, उजेडाची ओढ कायम राखणे आवश्यकच आहे.

# सीरियल किलर रमन राघवची दहशत संपवणारे पोलीस अधिकारी ॲलेक्स फियालोह यांचे निधन





पन्नास वर्षांपूर्वी मुंबईत जबरदस्त दहशत निर्माण केलेला सीरियल किलर रमन राघवच्या मुसक्या आवळणारे पोलीस अधिकारी ॲलेक्स फियालोह यांचे निधन झाले आहे. वयाच्या ९२व्या वर्षी त्यांनी शनिवारी मुंबईत अखेरचा श्वास घेतला.मुंबईकरांना रमन राघवच्या दहशतीतून मुक्त करणाऱ्या फियालोह यांच्या कारवाईवर खूश होऊन पोलीस दलाने त्यावेळी त्यांनी १००० रुपयांचं बक्षीस देऊ केलं होतं. उत्तर मुंबई रमन राघवने पुरुष, स्त्रीया आणि लहान मुलं अशा ४१ लोकांच्या हत्या केल्या होत्या.सन १९६८ चा पावसाळा हा मुंबईसाठी मोठा दहशतीचा होता. या काळात केवळ दोन महिन्यांत शहरातील पुरुष, महिला आणि लहान मुलांच्या अतिशय निघृणपणे हत्या होत होत्या. एकामागून एक होत असलेल्या या हत्याकांडामुळे उत्तर मुंबईत प्रचंड दहशत निर्माण झाली होती. दरम्यान, २४ ऑगस्ट रोजी सब इन्स्पेक्टर ॲलेक्स फियालोह यांनी मुंबईतील डोंगरी भागात त्याच्या मुसक्या आवळल्या.या धडाकेबाज कारवाईमुळे सब इन्स्पेक्टर फियालोह यांना मोठी प्रसिद्धी, वाहवा आणि पोलिसी कारकीर्दीला मोठा ब्रेकही मिळाला.रमन राघव सारख्या खतरनाक गुन्हेगाराला पकडणाऱ्या ॲलेक्स फियालोह यांचा राष्ट्रपती पदकाने गौरव करण्यात आला. तसेच यशाची एक-एक पायरी चढत ते सहाय्यक पोलीस आयुक्त म्हणून ते निवृत्त झाले.मुंबईचे माजी पोलीस आयुक्त ज्युलिओ रिबेरिओ यांनी एका मुलाखतीत सांगितले होते की, "फियालोह हे मुंबईत येण्यापूर्वीच एक सेलिब्रेटी होते. त्यांच्याबद्दल मी ऐकून होतो की ते एक चांगले हॉकीपटू असून पोलीस संघात खेळत होते. त्यानंतरच्या वर्षांमध्ये माझा त्यांच्याशी संवाद झाला त्यावेळी मला कळालं की या व्यक्तीला त्याचं काम नक्की काय आहे हे चांगलं ठाऊक आहे. त्यामुळे पुढे ते रमन राघवच्या मुसक्या आवळण्याल्याबद्दल ओळखले जाऊ लागले." सन २०१६ मध्ये चित्रपट निर्माता अनुराग कश्यपने रमन राघव नावाचा चित्रपट केला होता. यामध्ये नवाजुद्दीन सिद्दीकीने रमन राघवची भूमिका साकारली होती. यावेळी रिबेरे यांची मुलाखत घेण्यात आली होती त्यावेळी त्यांनी फोयालोह यांच्या आठवणींना उजाळा दिला.राघवला पकडण्यासाठी विशेष पथक.१९६८मध्ये दोन महिन्यांमध्ये मुंबईमध्ये प्रचंड हत्यासत्र सुरु होतं. बेघर लोकांच्या हत्या होत होत्या, त्यामुळे मुंबईत प्रचंड दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते.लोक रात्र झाल्यानंतर घराबाहेर पडण्यास घाबरत होते. घराबाहेर पडायचंच असेल तर स्वसंरक्षणासाठी स्वतःजवळ काठी किंवा हत्यारं बाळगत होते. त्यावेळी मुंबईचे पोलीस आयुक्त, असलेले इमॅन्युएल मोडक. हे या हत्यासत्राचा लवकरात लवकर छडा लावण्याच्या प्रयत्नात होते. यासाठी त्यांनी पोलीस निरीक्षक विनायकराव वाकटकर यांच्या नेतृत्वाखाली पथक नेमलं. प्राथमिक तपासानंतर रेकॉर्डवरील एक गुन्हेगार जो मूळचा तामिळनाडूचा रहिवासी आहे अशा रमन राघववर या पथकानं लक्ष केंद्रीत केलं. यावेळी ॲलेक्स फियालोह हे वाकटकर यांच्या टीममध्ये होते. ते कायम आपल्या खिशामध्ये रमन राघवचा फोटो ठेवत होते. दरम्यान, २४ ऑगस्ट १९६८ रोजी त्यांना ही फोटोतली व्यक्ती डोंगरी भागात फिरताना दिसली. त्यानंतर ते त्याच्याजवळ चालत गेले आणि त्याला ताब्यात घेतलं.रमन राघवला कसं घेतं ताब्यात ? एका मुलाखतीत राघवला कसं ताब्यात घेतलं याबाबत सांगताना फियालोह म्हणाले होते, "राघव हा डोंगरी भागात एक पावसाच्या पाण्याने ओली झालेली छत्री घेऊन पाऊस नसलेल्या सूर्यप्रकाशित डोंगरी भागातून जात होता. तो रमन राघव असल्याची त्यांना शंका होतीच त्यामुळे ते त्याच्यापर्यंत पोहोचले आणि त्यांनी त्याला प्रश्न केला की तू पाऊस नसलेल्या भागात ओल्या छत्रीसह कसा? यावर त्याने सांगितलं की तो मालाडवरुन डोंगरीत आला आहे. त्यावेळी मालाडमध्ये पाऊस सुरु होता. दरम्यान, पोलिसांनी काही दिवसांपूर्वी रमन राघव मालाडमध्येच दिसून आला होता. यावरुन फोयालोह यांनी तात्काळ त्याला ताब्यात घेतलं त्यानंतर चौकशीमध्ये राघवने आपला गुन्हा कबूल केला. आणि आपणचं ४० हत्या केल्याचं कबूल केलं. त्यानंतर तो कोर्टात दोषी ठरला आणि त्याला जन्मठेपेची शिक्षा झाली.

# भाऊबीजेच्या दिवशी वीरमरण पत्करलेल्या शहीद भावाच्या पार्थिवाचे बहिणीने केले औक्षण



मुंबई, बहीण भावाच्या नात्यातील स्नेह वाढवणारा सण म्हणजे भाऊबीज...या दिवशी भावाचे औक्षण करून त्याच्या दिर्घायुष्याची कामना सगळ्या बहिणी करतात. पण आज भाऊबीजेच्या दिवशी शहिद जवान ऋषिकेश यांची बहिण कल्याणी हिच्यावर ऋषिकेशच्या पार्थिवाचे औक्षण करण्याची वेळ आली. ऋषिकेश यांच्या पार्थिवाचे तिने औक्षण करताच उपस्थितांच्या अश्रूंचा बांध फुटला. अत्यंत वेदनादायी असा क्षण कोल्हापूर जिल्ह्यातील बहिरेवाडितील ग्रामस्थांनी आज अनुभवला.आजरा तालुक्यातील बहिरेवाडी गावातील जवान ऋषिकेश जोंधळे हे काश्मीरमध्ये पाकिस्तानच्या भ्याड हल्ल्यात शहीद झाले. आज कोल्हापूर जिल्ह्यातील बहिरेवाडी गावात शासकिय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. शुक्रवारी ऋषिकेश शहिद झाले. ही बातमी समजता आई-वडिल आणि बहिणीवर दुःखाचा डोंगर कोसळला. संपूर्ण गावात शोककळा पसरली. चार दिवसांनी ऋषिकेशचे पार्थिव गावात दाखल झाले.ऋषिकेश यांच्या अंत्यदर्शनासाठी पंचक्रोशीतील हजारो नागरिक पहाटे पासून उपस्थित होते. वीर जवान अमर रहे चर्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. ऋषिकेश जोंधळे यांचा आम्हाला सार्थ अभिमान आहे अशा भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या.सकाळी साडे सातच्या सुमारास बहिरेवाडी या ऋषीकेश यांच्या मुळगावी पार्थिव आणण्यात आले. त्यांच्या घरासमोर पार्थिव ठेवल्यानंतर कुटूंबियांनी आक्रोश केला. अवघ्या वीस वर्षांच्या या जवानाचे अंत्यदर्शन घेताना अनेकांना अश्रूंचा बांध फुटला. त्यानंतर गावात अंतयात्रा काढण्यात आली. अंतिम यात्रा भैरवनाथ हायस्कूलच्या मैदानात आल्यानंतर पार्थिव दर्शनासाठी ठेवण्यात आले.या ठिकाणी पालकमंत्री सतेज पाटील,ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ, खासदार संजय मंडलिक, अमरजीत राजा घाटगे, माजी आमदार संजय घाटगे, जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनी श्रद्धांजली वाहिली. लष्कर आणि पोलिसांनी बंदुकीच्या फैरी झाडून मानवंदना दिली. यावेळी भारत माता की जय....चा जयघोष झाला. शहिद जवान ऋषिकेश जोंधळे यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अंत्यसंस्काराच्या ठिकाणी खबरदारी घेतली होती.

# महामार्गावरील वाहनांना थांबून चालकास बळजबरीने मारहाण करुन चोरी करणाऱ्या तीन आरोपींना वालीव पोलीस ठाण्याने केले गजाआड



वालीव पोलीस ठाणे हद्दीत महामार्गावर रणजित राधेश्याम यादव नामक व्यक्ती वाहनाने जात असताना त्याला बळजबरीने थांबून मारहाण करून रोख रक्कम चोरी करून तीन आरोपी फरार झाले. या संपूर्ण घटनेची तक्रार रणजित यादव यांनी वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नं. ९७१/२०२० भादविस कलम ३९७,३४ अन्वये दाखल केली.सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने माननीय वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो. यांनी तात्काळ मार्गदर्शन करून आरोपींचा तपास घेऊन कारवाई करण्याबाबत आदेश दिला. घटनास्थळावर मिळालेल्या तांत्रिक गोष्टीचा सहाय्याने तपास करून आरोपी नामे १)श्याम राठोड (वय ३५) २) रामेश्वर चव्हाण (वय ३१) ३)विनोद दुवे (वय४१) यांना गुन्हे शाखेतील अधिकारी व कर्मचारी यांच्या पथकाने आरोपींना अटक केली. तपासणी करत असताना आरोपींकडून मोटर सायकल, मोबाईल आणि रोख रक्कम ५५,०००/- किंमतीचा माल हस्तगत करण्यात आला.सदर गुन्ह्याची कामगिरी माननीय श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ वसई-विरार, श्रीमती.अश्विनी पाटील सहाय्यक पोलीस आयुक्त वसई विभाग, पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विलास चौगुले पोलीस निरीक्षक श्री.चंद्रकांत सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश फडतरे, पोलीस हवालदार मनोज मोरे व पथकाने केली आहे

# दिवाळीसाठी बँकेतून पैसे काढले आणि काही तासांत लुटले गेले!



दिवाळीसाठी बँकेतून काढलेली रक्कम घरी घेऊन जाण्यासाठी निघालेल्या महावितरणच्या कर्मचाऱ्याला शहाड रेल्वे स्थानकात दोन शस्त्रधारी इसमांनी शस्त्राचा धाख दाखवून लुटल्याची घटना नुकतीच शहाड रेल्वे स्थानक फलाट क्रमांक १ वर घडली. लुटारूंनी या कर्मचाऱ्याकडून मोबाईल फोन आणि २० हजार रुपयांची रोकड लुटून पोबारा केला. या प्रकरणी कल्याण रेल्वे पोलिसांनी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून त्यांचा कसून शोध घेण्यात येत आहे. कल्याण रेल्वे पोलिसांच्या हद्दीत वाढत्या गुन्ह्यांमुळे प्रवाश्यामध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

टिटवाळा येथे राहणारे संजय शिर्के (४०) हे महावितरणच्या कल्याण येथील कार्यालयात कामाला आहेत. ९ नोव्हेंबर रोजी संजय शिर्के हे सायंकाळी कल्याण येथील बँकेतून दिवाळीसाठी २० हजार रुपये काढून घरी जाण्यासाठी निघाले होते. दरम्यान, संजय शिर्के हे रात्री ९ वाजण्याच्या सुमारास शहाड रेल्वे स्थानक फलाट क्रमांक १ वर टिटवाळा येथे जाण्यासाठी ट्रेनची वाट पहात उभे होते. दोन शस्त्रधारी इसम शिर्के यांच्या पाठीमागून आले आणि त्यांनी शिर्के यांना शस्त्राचा धाक दाखवून त्यांच्या खिशातील मोबाईल फोन काढत असताना त्यांनी विरोध केला असता एकाने शिर्के यांना पाठीमागील पकडले व दुसऱ्याने त्यांच्या खिशातील मोबाईल फोन, २० हजार रुपयांची रोकड आणि कानातील सोन्याची बाळी असा एकूण ३५ हजार रुपयांचा ऐवज काढून घेतला. शिवाय प्रवासी संजय शिर्के यांना फलाटावरून खाली लोटून दोघं लुटारूंनी तेथून पळ काढला. रात्री खूप उशीर झाल्यामुळे संजय शिर्के हे तसेच घरी गेले आणि दुसऱ्या दिवशी कल्याण रेल्वे पोलीस ठाण्यात आपली तक्रार दाखल केली. या प्रकरणी कल्याण रेल्वे पोलिसांनी दोन अनोळखी इसमांविरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला असून फलाटावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या फुटेजवरून दोघांचा शोध घेण्यात येत असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

काही प्रवाशांनी दिलेल्या माहितीनुसार कल्याण रेल्वे पोलिसांच्या हद्दीत मागील काही महिन्यांपासून चोरी, जबरी चोरी सारखे गुन्हे दररोज घडत आहेत. कल्याण रेल्वे स्थानक सोडले तर इतर रेल्वे स्थानकांवर पोलीस दिसून येत नसल्यामुळे चोरट्यांकडून या स्थानकावर लूटमार सुरु असते. शहाड येथे घडलेल्या घटनेच्या दिवशी देखील फलाटावर एकही पोलीस अंमलदार हजर नसल्यामुळे ही घटना घडली असल्याचे सांगण्यात येत आहे.

# अपघातात जखमी झाल्याचा फायदा घेऊन चोरट्याने लंपास केली 1 लाख 97 हजार असलेली बॅग




लोणी काळभोर - अपघातात एकजण गंभीर जखमी झाल्याचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने जखमी जवळ असलेली १ लाख ९७ हजार रूपये ठेवलेली बॅग चोरून नेली आहे. याप्रकरणी सुशील चंद्रकांत देसाई ( वय २९, रा. अविनाश कपूर यांचेकडे भाड्याने, शेवाळेवाडी, संपन्न होम मांजरी. ) यांनी दिलेल्या फिर्यादी वरून अज्ञात चोरट्यांविरोधांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरज बंडगर यांनी दिलेल्या माहितीनुसार देसाई हे कदमवाकवस्ती ( ता. हवेली ) ग्रामपंचायत हद्दीतील वेन्टाईल कंपनीमध्ये कस्टमर केअर मॅनेजर म्हणून कार्यरत आहेत. कंपनीत दिवसभराची जमा झालेली रोख रक्कम ते स्वतः बिबवेवाडी येथील मुख्य कार्यालयात जमा करतात. शुक्रवार (१३ नोव्हेंबर ) रोजी ९ वाजण्याच्या सुमारांस होंडा शाईन दुचाकी क्रमांक एमएच १२ एलई ३५२९ वरून एकटेच बिबवेवाडी येथील मुख्य कार्यालयात दिवसभर जमा झालेली रोख रक्कम १ लाख ९७ हजार ही एका काळे रंगाचे बॅगमधून घेवून जात होते. रात्री ९ - १५ वाजण्यांच्या सुमारास ते कदमवाकवस्ती ग्रामपंचायत समोरील चंद्राई हार्डवेअर समोर आले असता सोलापुर - पुणे महामार्गावरून त्यांचे पुढे चाललेला टँकर ( क्रमांक माहीत नाही ) अचानक थांबलेने दुचाकी मागून धडकल्याने अपघात झाला. यामुळे देसाई यांचा डावा गाल व गळयावर मार लागला तसेच उजवे हाताला मार लागून फॅक्चर झालेने त्यांना चक्कर येत होती. त्या ठिकाणी जमलेल्या लोकांनी त्यांना उपचारासाठी नजीकच्या खाजगी रूग्णालयात पाठवले. औषधोपचार सुरू झालेवर कंपनीचे सुरक्षारक्षक जनार्दन नवले व कॅशियर निखिल गवळी हे तेथे पोहोचले त्यावेळी देसाई यांनी त्यांना अपघाताचे वेळी जवळ असलेली काळे रंगाची रोख रक्कम ठेवलेली बॅग अपघाताचे ठिकाणी आहे काय बघून या असे सांगितले. दोघे त्या ठिकाणी गेले. तेथील लोकांकडे विचारपूस करून परीसरात शोध घेतला परंतू बॅग मिळाली नाही. म्हणून त्यांनी अपघाताचा फायदा घेवून कोणीतरी अज्ञात चोटयाने त्यांचे ताब्यातील काळे रंगाचे बॅगमधील १ लाख ९७ हजार रूपये रोख चोरून नेला आहे, म्हणून माझी अज्ञात टॅंकर वरील चालक व अज्ञात चोरटया विरूध्द तक्रार दिली आहे.

# पूजेसाठी ठेवलेले दागिने चोरणाऱ्यास 24 तासांत अटक



पुणे/ येरवडा - लक्ष्मीपूजनाच्या दिवशी पूजेसाठी ठेवले दागिने व रोख रक्कम चोरी करणाऱ्या आरोपीला येरवडा पोलिसांनी 24 तासांत जेरबंद केले. अविनाश उर्फ सुक्या संजय शिंदे (वय 18, रा. जय जवान नगर येरवडा) याच्यासह एका अल्पवयीन विधिसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेण्यात आले आहे. त्याच्याकडून चोरी केलेले 11 तोळे सोन्याचे दागिने, दोन मोबाईल व रोख रक्कम असा सुमारे 4 लाख 60 हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी रात्री येरवड्यातील जयजवाननगर येथे मानसिंग भोसले यांच्या अर्धवट उघड्या ठेवलेल्या खिडकीतून हात घालून कडी उचकटून घरातील दागिने, मोबाईल व रोख रक्कम असा मुद्देमाल लंपास केला होता. याप्रकरणी येरवडा पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. येरवडा तपास पथकातील कर्मचारी पोलीस हवालदार गणपत थीकोळे, पोलीस नाईक नवनाथ मोहिते, शिपाई राहुल परदेशी यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, या गुन्ह्यातील आरोपी येरवड्यातील गेनबा मोझे शाळेजवळ उभे असल्याची माहिती मिळाली होती. तात्काळ सापळा रचून त्यांना ताब्यात घेण्यात आले. अधिक तपासात त्यांनीच हा गुन्हा केल्याची कबुली दिली. गुन्हा घडल्यानंतर चोवीस तासाच्या आत आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडील गुन्ह्यातील 11 तोळे सोन्याचे दागिने 2 मोबाईल व रोख रक्कम असं चार लाख 60 हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.वरिष्ठ पोलीस निरीक्षक युनूस शेख गुन्हे निरीक्षक अजय वाघमारे, यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक समीर करपे, सहा. फौजदार प्रदीप सुर्वे, हवालदार गणपत थीकोळे, पोलीस कर्मचारी नवनाथ मोहिते, राहुल परदेशी, सुनील सकट, समीर भोरडे, अहमद शेख, अनिल शिंदे, गणेश वाघ, तेजस पवार, किरण घुटे यांच्या पथकाने गुन्हा दाखल झाल्यानंतर 24 तासाच्या आत गुन्ह्यांचा तपास लावला.

# याला काय म्हणावं? दार वाजवले म्हणून डोंबिवलीत एकाची हत्या




रात्रीचे दार वाजवले या क्षुल्लक कारणावरून एकाची दगडाने ठेचून हत्या करण्यात आल्याचा खळबळजनक प्रकार शनिवारी मध्यरात्री डोंबिवली पूर्वेतील आयरे गाव परिसरात घडली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून डोंबिवली पोलिसांनी या प्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल करून एकाला अटक केली असल्याची माहिती डोंबिवली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन सांडभोर यांनी दिली.संजय महादेव गवळी (३२) असे हत्या करण्यात आलेल्या इसमाचे नाव असून तो पत्नीसह डोंबिवली पूर्वेतील आयरे गाव, ज्योती नगर या ठिकाणी राहण्यास होता. त्याच परिसरात राहणारा आरोपी दीपक प्रभाकर मोरे (३०) हा राहण्यास आहे. आपल्या पत्नीसोबत संजयचे प्रेमसंबंध असल्याचा संशय दीपकला होता, त्यातून अनेकवेळा दोघांमध्ये वाद झाला होता. शनिवारी मध्यरात्री घराचे दार वाजले म्हणून दीपक बाहेर आला असता जवळच संजय उभा होता. संजयनेच आपल्या घराचे दार वाजवले असे वाटून दीपकने संजयला जाब विचारला. यावरून दोघांत भांडण झाले. या भांडणातून दीपकने जवळच पडलेला दगड उचलून संजयच्या डोक्यात प्रहार केला. संजय हा रक्ताच्या थारोळ्यात पडताच दीपकने त्याच दगडाने संजयची ठेचून हत्या केली. या घटनेची माहिती मिळताच डोबिवली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन सांडभोर आपल्या पथकासह घटनास्थळी दाखल झाले, दरम्यान, हत्या करून फरार झालेल्या दीपकचा शोध घेण्यासाठी पोलिसांचे एक पथक रवाना झाले. पोलीस पथकाने काही तासातच लपून बसलेल्या दीपकला डोंबिवली परिसरातून अटक केली. या प्रकरणी डोंबिवली पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल केला असून आरोपीला अटक करण्यात आली असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक सांडभोर यांनी दिली.

# मुंबईत पार पडले 28 वे अवयवदान



मुंबईतील वाढत्या जनजागृतीमुळे अवयवदान करण्याकडे नागरिकांचा कल वाढत आहे. लिलावती रुग्णालयात शनिवारी मेंदूमृत झालेल्या एका व्यक्तीच्या कुटुंबाने अवयवदानाचा निर्णय घेतल्याने एका व्यक्तीला जीवदान मिळाले आहे. कोरोनामुळे यंदा अवयवदान फार कमी प्रमाणात झाले. मात्र लिलावती रुग्णालयात मूत्रपिंड दान करण्यात आले. हे मुंबईतील २८ वे अवयवदान ठरले आहे. लिलावती रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल झालेल्या २३ वर्षीय तरुणाचा शनिवारी मेंदूमृत झाला. रुग्णालयातील डॉक्टरांनी तरुणाच्या नातेवाईकांना अवयवदानाबाबत माहिती दिली. तरुणाचे नातेवाईक अवयवदानाबाबत जागरुक असल्याने त्यांनी तातडीने अवयवदानाचा निर्णय घेतला. त्यानुसार डॉक्टरांनी विभागीय प्रत्यारोपण समन्वय समितीच्या मार्गदर्शनाखाली अवयवदानाची प्रक्रियेला सुरुवात केली. मेंदूमृत झालेल्या तरुणाचे मूत्रपिंड लिलावती हॉस्पिटलमधीलच एका रुग्णाला देण्यात आले. मेंदूमृत झालेल्या व्यक्तीच्या कुटुंबियांनी घेतलेल्या या निर्णयामुळे एका व्यक्तीला जीवदान मिळाले आहे. लिलावती हॉस्पिटलमध्ये झालेले हे यशस्वी अवयव प्रत्यारोपण मुंबईतील यावर्षीचे २८ वे अवयवदान ठरले आहे.






# मुंबई - अंधेरीतील साकीनाका परिसरात भीषण आग



मुंबईतील अंधेरी येथील साकीनाका परिसरात भीषण आग लागल्याचे समोर येत आहे. साकीनाका मधील खाडी नंबर ३ येथील झोपडपट्टीत ही भीषण आग लागली आहे. अग्निशमन दलाच्या ६ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. आजूबाजूला झोपटपट्टीचा परिसर असल्यामुळे आग पसरण्याचा धोका जास्त असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे अग्निशमन दलाच्या जवानांचे आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्नामुळे ही आग आटोक्यात आणण्यात यश आले आहे. आज सकाळी साकिनाका परिसरातल्या झोपडपट्ट्यांनी ही मोठी आग लागली आहे. माहितीनुसार या ठिकाणी १० ते १२ झोपट्या आहेत. १० झोपडपट्ट्यांमधील आग आटोक्यात आली आहे. पण जीवतहानी होण्याची मोठ्या शक्यता वर्तवली जात आहे. तसेच या आगीत ७ ते ८ झोपडपट्ट्या जळून खाक झाल्या आहेत. ही आग लेव्हल २ची असल्याचे अग्निशमन दलाकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे सध्या युद्धपातळी आग विझवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. पण या ठिकाणी असलेल्या अरुंद गल्ल्यांमुळे अग्निशमन दलासमोर अडचण निर्माण होत आहे.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ). संपर्कः-9594418181 / 8424989898